महाराष्ट्र पक्षीमित्र संघटनेचे त्रैमासिक मुखपत्र

# पक्षीमित्र

■ वर्ष आठवे ■ अंक २ रा ■ संपादक : दिगंबर गाडगीळ ■ १ जानेवारी २०१८ पाने-१४

संपादकीय

## उत्साह संचारला

या वर्षी पहिल्यानेच अरण्यऋषी मारुती चितमपल्ली यांच्या जन्मदिनापासून (५ नोव्हेंबर) ते डॉ. सालिम अली जन्मदिनापर्यंत (१२ नोव्हेंबर) पक्षीसप्ताह साजरा करावा, अशी सूचना 'महाराष्ट्र पक्षीमित्र'ने केली होती. घोषणा तशी ऐनवेळीच झाली होती. या काळात प्रामुख्याने पक्षीनिरीक्षण व्हावे व जमल्यास इतर कार्यक्रम व्हावेत अशी अपेक्षा होती. त्याला प्रतिसाद म्हणून २१ जिल्ह्यांतील २९ ठिकाणी कार्यक्रम झाले. त्यात पक्षीनिरीक्षण / मोजणी यांखेरीज स्लाइड शो, व्याख्याने, मेळावे यांचा समावेश होता.

आश्चर्याची गोष्ट म्हणजे मुंबई, सांगली, सातारा यांसारख्या जिल्ह्यात जिथे आपले पक्षीमित्र कार्यरत आहेत, तिथे कार्यक्रम झालेले दिसत नाहीत. (निदान या उपक्रमाचे संयोजक डॉ. जयंत वडतकर यांच्यापर्यंत तरी पोचलेले नाहीत.)

दरवर्षी पक्ष्यांच्या हिवाळी पक्षीगणनेची हाक देण्यात येते. त्याला मिळणाऱ्या प्रतिसादापेक्षा हा प्रतिसाद आश्वासक आहे. पुढील वर्षी याहून मोठा प्रतिसाद मिळेल, अशी आशा करतो.

या उत्साहाचा परिणाम म्हणूनच की काय ठाणे संमेलनाच्या उपस्थितीने उच्चांक गाठला होता. ते संमेलन व्यवस्थितरीत्या सफल झाले याबद्दल ठाणे संमेलनाच्या आयोजकांना धन्यवाद.

ठाणे संमेलनातील महाराष्ट्र पक्षीमित्र संमेलनाच्या वार्षिक सभेतून आणखी एक बदल समोर आला तो म्हणजे १ एप्रिल १८ पासून जबाबदारी स्वीकारणारी नवी कार्यकारिणी. तिचे नेतृत्व डॉ. जयंत वडतकर यांच्याकडे आले आहे. विदर्भातील पक्षीचळवळ अधिक गतिमान आहे. त्यांच्या विभागीय संमेलनात सातत्य आहे. त्याचा प्रभाव संघटना अधिक गतिमान होण्यात, नवे उपक्रम निर्माण होण्यात होईल हा आशावाद व्यक्त करीत थांबतो.

– दिगंबर गाडगीळ

३९, आनंदवन कॉलनी, ऑफ कॉलेज रोड, नाशिक – ४२२००५

स्थिरभाष : (०२५३)२५७७९६८, चलभाष : ९८८१०७९७११, *E-mail : dgadgil09@gmail.com*

**पक्षीमित्रच्या संदर्भातील पत्रव्यवहार, लेख संपादकांकडे पाठवावा. प्रशासकीय बाबींबद्दल मात्र चिपळूणच्या पत्त्यावर लिहावे.**

## महाराष्ट्र पक्षीमित्र कार्यकारी मंडळ

### १-४-१८ ते ३१-३-२१

अध्यक्ष : डॉ. जयंत वडतकर, अमरावती
कार्याध्यक्ष : डॉ. राजू कसंबे, ठाणे
संघटक : प्रा. सुधाकर कुऱ्हाडे, अहमदनगर
कार्यवाह : प्रा. गजानन वाघ, अमरावती
सहकार्यवाह : श्री. शरद आपटे, सांगली
सहसंघटक : श्री. अनिल माळी, नाशिक

सदस्य : १) प्रा. निनाद शहा, सोलापूर
२) प्रा. किशोर गठडी, औरंगाबाद
३) श्री. रोहन भाटे, कराड
४) श्री. सचिन मेन, पालघर
५) श्री. अनिल महाजन, जळगाव

**टीप : हा अंक आपल्या मित्रांपर्यंत पोहचवा, ते सभासद होतील !**

# अध्यक्षीय

नमस्कार पक्षीमित्रहो,

दि. २४ ऑक्टोबर २००९ रोजी महाराष्ट्र पक्षीमित्र संस्थेचे अध्यक्षपद अनपेक्षितपणे माझ्याकडे आले. त्यावेळी मी पाच वर्ष जबाबदारी घेईन म्हणत असता आता ९ वर्ष झाली. नंतर तीन वेळा कार्यकारी मंडळ बदलले परंतु अध्यक्षीय जबाबदारी माझ्याकडेच होती. चिपळूण संमेलनात सभासद ७३ होते ते आता १०४६ झाले आहेत. याच काळात आपण काही वर्ष महापक्षीगणना, सारस संरक्षण निधी (आता प्रकाश गोळे संरक्षण निधी), संस्थेची वेबसाईट, इत्यादी काही गोष्टी केल्या. प्रत्येक वर्षी वार्षिक सर्वसाधारण सभा व कार्यकारी मंडळ सभा यामध्ये खूप चर्चा करून विविध कार्यक्रम करण्याचे ठरवले परंतु प्रत्यक्षात फार काही घडलेच नाही याची खंत वाटते. परंतु संस्थेचे एकूण कार्य नियमित व उत्तम प्रकारे चालू झाले आहे.

ठाणे संमेलनात नवीन कार्यकारी मंडळाची (सन २०१८-१९ ते २०२०-२१) निवड झाली असून अध्यक्ष म्हणून तरुण तडफदार पक्षिमित्र डॉ. जयंत वडतकर यांच्या नेतृत्वाखाली १० सदस्यांची निवड झाली आहे. डॉ. वडतकर व त्यांच्या टीमने ही जबाबदारी स्वीकारली आहे ही आनंदाची बाब आहे.

गेल्या ९ वर्षांमध्ये पक्षीमित्रसाठी प्रामाणिकपणे काम करण्याचा प्रयत्न केला. खूप काही करू शकलो नाही परंतु संस्था एका नियमित मार्गावर आहे. गेल्या ९ वर्षांच्या काळात विविध सभा, पक्षीमित्रमध्ये वेळोवेळी मी कठोरपणे पण स्पष्ट बोलत आलो आहे, क्षमस्व. अर्थातच हे संस्थेच्या उद्दिष्टपूर्तीसाठी व नियमांसाठी होते, त्यामध्ये कोणताही वैयक्तिक आकस नाही. तरीही त्याचा कोणीही राग मानू नये ही नम्र विनंती.

अध्यक्ष म्हणून हा शेवटचा अंक देऊन मी आपली रजा घेत आहे. संस्थेचा अध्यक्ष नसलो तरी पक्षीमित्रच्या सर्व कार्यात शक्यते सर्व काम, सहकार्य करत राहीन याची खात्री देतो.

नवीन अध्यक्ष व कार्यकारी मंडळ जोमाने कार्य करेल याची खात्री आहे. त्यांना त्यांच्या कार्यासाठी शुभेच्छा.

– भाऊ काटदरे

९३७३६१०८१७

# चिऊताईला अंगणात येऊ द्या !

२० मार्चला 'जागतिक चिमणी दिवसा'ची आठवण ठेऊन आपण जनजागृती केली. विविध माध्यमांद्वारे 'चिमणी' या पक्ष्याविषयी जिव्हाळा निर्माण करून विविध उपक्रमही राबविल्याच्या बातम्या आपण वाचल्या आहेत. खरे तर 'पक्षी' हा निसर्गातील एक घटक. त्यातही 'चिमणी' हा एक सर्वांच्या परिचयाचा छोटा पक्षी. मानवाला सर्वात जवळचा आणि सहवास लाभलेला जीव. सर्वत्र आढळणारा तथापी मानवाने गाव सोडून शहराकडे धाव घेत स्वतःच्या विकासाचा ध्यास घेतला. शहरातील उंच इमारती, वाढती वाहने, कमी होत जाणारी वृक्षसंपदा, त्याचा परिणाम म्हणून चिमण्यांची संख्या घटत गेली. ही जाणीव झाल्यावर चिमणीला घर दिले पाहिजे. या उद्देशाने 'जागतिक चिमणी दिवस' साजरा करण्याची वेळ आली. खरे तर चिमणीसाठी एक दिवस नव्हे तर प्रत्येक दिवशी तिची आठवण ठेवली पाहिजे.

वर्तमान जगत असताना भूतकाळातील काही गोष्टी जपल्या पाहिजेत. त्यातील एक म्हणजे चिमणीचं संरक्षण. येथे एक गोष्ट आठवू या! घर, अंगण, वाड्यात चिमणीचं अस्तित्व असायचं. लहान बाळाला खाऊ घालताना आई बाळाला अंगणात घेऊन यायची. चिऊ, काऊ विषयी गोष्टी सांगत, गुणगुणत घास भरवायची. त्यावेळी ती माऊली म्हणायची–

चिवचिव चिमणी, खाते दाणे, पिते पाणी, तसेच
चिवचिव ये, दाणा खा, पाणी पी आणि
ये गं ये गं चिऊ, दाणा खाऊ, पाणी पिऊ, भूर्कन उडून जाऊ!

असे गुणगुणताच अंगणात चिमणी यायचे, दाणा खायची, पाणी प्यायची. चिमणीचा हवाहवासा वाटणारा सहवास आणि चिवचिवाट अनुभवयाचा असेल तर आपण हे अवश्य करा. घराजवळील अंगणात, गच्चीवर चिमणीसाठी बाजरीचे दाणे ठेवा. अंगणातील उंच जागेवर संक्रातीच्या वाणाच्या प्रसंगी वापरलेल्या सुगडात, गाडग्यात पाणी भरून ठेवा. मी माझ्या घराच्या अंगणातील वृंदावनात सुगडात पाणी भरून ठेवत असतो. गच्चीवर बाजरीचे दाणेही ठेवत असतो. चिमण्या काटेरी झाडांचा आश्रय घेत असतात. शक्य असेल तर लिंबाचं झाड लावा. असे सोपे उपाय करून आपण चिमणीला सहारा देऊ शकतो. चिमण्या येतील! 'या चिमण्यांनो परत फिरारे', असे म्हणण्याची वेळच येणार नाही!

– बाळासाहेब कुलकर्णी

मो. ९८२२४६५४१०

# घरट्यातून पडलेले पिलू

पक्षीमित्रांना 'घरट्यातून खाली पडलेलं पिलू उचलून घरट्यात ठेवलं तर त्याचे आईबाबा त्याच्याकडे लक्ष देत नाहीत' हे खरं आहे का हा प्रश्न विचारला जातो. काय आहे त्याचं योग्य उत्तर ?

Cornell Lab of Ornithology तील शास्त्रज्ञ मियोको चू म्हणतात, 'पक्ष्यांचं घ्राणेंद्रिय फारसं सक्षम नसतं. त्यामुळे तुम्ही उचलून ठेवलेल्या पिलाच्या शरीराला झालेल्या तुमच्या स्पर्शाचा वास त्याच्या आईबाबांना कळणार नसतो.' तेव्हा असहाय पिलू त्याच्या घरट्यात ठेवायला हरकत नाही.

जरा मोठं झालेलं पिलू खाली पडलं तर त्याला उडता येत नसतं व त्याच्या पालकांनाही त्याला उचलून नेता येत नाही. अशा पिलाला त्याचे पालक तिथे येऊन भरवताना दिसतात. अशा परिस्थितीत हस्तक्षेप न केलेला बरा.

# ३१ व्या महाराष्ट्र राज्य पक्षीमित्र संमेलनाचे अध्यक्ष श्री. दत्ताजी उगांवकर यांचे अध्यक्षीय मनोगत

आजच्या ३१ व्या महाराष्ट्र राज्य पक्षीमित्र संमेलनास उपस्थित असलेल्या सर्व पक्षीप्रेमी, तसेच या संमेलनाचे यजमान होप नेचर ट्रस्ट यांचे सर्व पदाधिकारी या सर्वांना मी मनःपूर्वक धन्यवाद देतो. माझ्या निवडीबद्दल असंख्य पक्षीमित्रांनी माझे फोनवरून, तसेच इमेल व फेसबुकवरून अभिनंदन केले त्या सर्वांचा मी आभारी आहे.

महाराष्ट्र पक्षीमित्र संघटनेने या संमेलनाच्या अध्यक्षपदी माझी निवड केली त्याबद्दल त्यांना धन्यवाद! या संमेलनाचे प्रमुख अतिथी श्री. उल्हासजी राणे, जे माझे पहिले गुरू आहेत त्यांना नम्रतापूर्वक अभिवादन करतो. हे मी नमूद करू इच्छितो की मी पक्षीतज्ज्ञ नसून या चळवळीतील सर्वसामान्य कार्यकर्ता आहे.

सन १९८२ साली डॉ. सालिम अली यांनी बी. एन.एच.एस. च्या तज्ज्ञ पक्षी-शास्त्रज्ञांसमवेत नांदूर-मध्यमेश्वरला भेट दिली होती, ते दोन दिवस माझ्या आयुष्यातील न विसरता येणारे आहेत. कारण तोपर्यंत पक्षी निरीक्षणात अनभिज्ञ असलेल्या मला पक्षी निरीक्षणाकडे आकृष्ट केले. त्यांचे समवेत त्यावेळी असलेले श्री. उल्हासजी राणे यांनी पक्षी निरीक्षणाचे प्राथमिक धडे मला दिले. त्यानंतर गेली ३५ वर्षे या क्षेत्रात मी कार्यरत आहे. या सर्व काळात श्री. उल्हासजी राणे यांच्याशी माझा संपर्क राहिलेला आहे. BNHS च्या माध्यमातून मी जी नांदूर-मध्यमेश्वरच्या पक्ष्यांची प्रथम सूची १९८९ साली प्रसिद्ध केली, त्यास त्यांनी आर्थिक साहाय्य केले होते, हे मी नमूद करू इच्छितो.

सन १९८२ च्या डॉ. सालिम अली यांच्या भेटीनंतर नांदूर-मध्यमेश्वर पक्षी अभयारण्य व्हावे या आमच्या मागणीला चालना मिळाली. नाशिकचे ज्येष्ठ पक्षीमित्र श्री. दिगंबरजी गाडगीळ, डॉ. विनय ठकार, डॉ. सुळे यांनी स्थापलेल्या नाशिक पक्षी मित्र मंडळामार्फत या मागणीचा शासकीय पातळीवर जोरदार पाठपुरावा करण्याचे प्रयत्न सुरू झाले. त्याचाच एक भाग म्हणून लष्करातील अधिकाऱ्यांकडून होणाऱ्या पक्ष्यांच्या शिकारीस प्रतिबंध करण्यात यश मिळाले. त्यापुढील पाऊल म्हणजे अभयारण्य जाहीर करण्यासाठी आवश्यक असलेला डाटा गोळा करणे हा होय. बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी, विश्व प्रकृती निधी, मध्य मुंबई विज्ञान संघ इत्यादी संस्थांच्या सहकार्यामुळे पायाभूत माहिती जमा झाली, याचवेळी डॉ. अल्मेडा यांच्या मार्गदर्शनाखाली flora of Nandur Madhymeshwar अशी सूची तयार करुन येथील वनस्पती समृद्धीचे दस्तावेजीकरण प्रसिद्ध करण्यात आले. थोर पक्षी शास्त्रज्ञ डॉ. सालिम अली यांनी त्यांच्या शिफारसपत्रात नांदूर-मध्यमेश्वर हे महाराष्ट्राचे भरतपूर होऊ शकते, असा अभिप्राय नोंदला होता.

या सर्व प्रयत्नांना यश येऊन महाराष्ट्र शासनाने १९८६ साली नांदूर-मध्यमेश्वरच्या पक्षी अभयारण्याची अधिसूचना प्रसिद्ध केली. परंतु या अभयारण्याच्या १००१२ हेक्टर क्षेत्रात सुमारे ८५०० हेक्टर खासगी क्षेत्र समाविष्ट केल्यामुळे या काळात येथील खेड्यात स्थानिक पातळीवर प्रचंड विरोध करण्यात आला. उग्र आंदोलन सुरू झालं. मोर्चे, घेराव, वर्तमानपत्रात मोहीम इत्यादी चालू झाले. या काळात मी स्थानिक असल्यामुळे सर्व रोख माझ्याकडे होता. परंतु सततच्या अथक प्रयत्नाने हा विरोध शांत झाला. या काळात नांदूर-मध्यमेश्वर अभयारण्याकडे शासनाने दुर्लक्षच केले. महाराष्ट्र वन्यजीव विभाग स्थापन झाल्यानंतर अभयारण्याच्या प्रगतीस खऱ्या अर्थाने चालना मिळाली.

आज नांदूर-मध्यमेश्वर अभयारण्य महाराष्ट्राच्या नकाशात सर्व सोयींनी युक्त पर्यटनस्थळ म्हणून प्रसिद्ध झाले आहे. पक्षी निरीक्षणसाठी मनोरे, गॅलऱ्या, राहण्यासाठी इकोहट्स, दुर्बिणी, टेलिस्कोप इत्यादींनी सुसज्ज प्रशिक्षित गाइड यामुळे पर्यटक पक्षी निरीक्षणाचा मनमुराद आनंद घेत आहेत.

**शहरी पक्षी :–**

या वर्षीचा ३१ व्या संमेलनाचा मुख्य विषय शहरी पक्षी आणि त्यांची जीवनपद्धती (Urban Bird and their lifestyle) हा अत्यंत महत्त्वाचा विषय आहे. कारण गावांचे शहरीकरण व शहराचे महानगरीकरण झपाट्याने वाढत असून त्यामुळे त्या त्या ठिकाणच्या पक्ष्यांच्या वस्तीस्थानावर परिणाम होत आहे. (शहरी कॉंक्रिटीकरणामुळे) शहरीकरण हे पक्ष्यांच्या विनाशाच्या मुळाशी येत आहे. माणसाच्या कोलाहलात पक्ष्यांचा आवाज लुप्त होत आहे. असे असले तरी पक्ष्यांच्या काही जातींनी या शहरी वातावरणास जुळवून घेत आपली जीवन पद्धती बदललेली दिसून येते. सततचा माणसांचा सहवासामुळे पक्ष्यांची माणसाबद्दलची भीती कमी होत चालल्याचे आढळून येत आहे. माणसाच्या जवळ जाण्याची लक्ष्मणरेषा पक्ष्यांनी आखून घेतल्याचे आढळते. निरनिराळ्या प्रजातींमध्ये ती निरनिराळी असू शकते. उदा. पारवे किंवा कबुतरे हे जास्त जवळीक साधतात. सर्वसामान्य ज्या पक्षीजाती शहरी पर्यावरणाशी जुळवून घेतात त्या सर्वसाधारणपणे मोठ्या आकाराच्या व म्हणूनच मोठ्या मेंदूच्या असतात. हे मोठ्या आकाराचे पक्षी माणसाच्या जास्त जवळ जातात, त्याचा मेंदू आकाराने मोठा असल्याने ते जास्त धोका पत्करू शकतात.

पक्ष्यांच्या या अशा जवळकीला शास्त्रज्ञांनी एक शब्द शोधला आहे तो म्हणजे Tolerance. असे निदर्शनास आले आहे की शहरातील भिन्न भिन्न क्षेत्रात निरनिराळ्या प्रजाती विखुरल्या जातात. सर्वसाधारणपणे वस्तीस्थानाचे वर्गीकरण नैसर्गिक विरूद्ध शहरी, ग्रामीण विरुद्ध शहरी, शहरी विरुद्ध उपनगरे, दाट किंवा विरळ लोकवस्ती असे करता येते. या प्रत्येक भागात आढळणाऱ्या प्रजाती विभिन्न असू शकतात. या पक्ष्यांच्या सान्निध्याचा मानवी जीवनावर विपरीत परिणाम अद्यापपर्यंत तरी आढळून आला नसला तरी बर्ड-फ्लू किंवा कबुतरांच्या अस्तित्वामुळे उद्भवणारे श्वसनाचे आजार याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.

मुख्यतः रॉबिन, ॲशी प्रिनीया, बुलबुल, मॅगपाय रॉबीन, लॅपविंग,

पाकोळ्या, गव्हाणीघुबड, कबुतरे, पारवे अशा प्रजाती जास्त करून शहरी वातावरणात आढळतात. पाश्चात्य देशातील संशोधनानुसार पेरिग्रीन फाल्कन हा शिकारी पक्षी शहराच्या मोठ्या व उंच इमारतीत वस्ती करून कबुतरांना आपले भक्ष्य बनवतो. एका संशोधनानुसार शहरी पक्षी ग्रामीण भागातील पक्ष्यांपेक्षा जास्त हुशार असतात, कावळ्याचे उदाहरण आपणास माहीतच आहे. तसेच शहरी पक्षी ग्रामीण भागातील पक्ष्यांपेक्षा सुदृढ असतात व जास्त आरडाओरडा करणारे असतात. आपल्या पुढील सत्रात या विषयावर विविध तज्ज्ञांकडून प्रबंध सादर होणार आहेत. त्यावर सविस्तर चर्चा पण अपेक्षित आहे. त्यावरून आपणास या विषयावर मार्गदर्शन मिळेल अशी आशा आहे.

**पक्षी गणना**

इथे जमलेल्या पक्षीमित्रांचा पक्षी निरीक्षणाचा श्रीगणेशा कोणत्या तरी जलाशयावर येणाऱ्या स्थलांतरित पक्ष्यांपासून सुरू झालेला असेल. महाराष्ट्रात निरनिराळ्या जलाशयांवर हिवाळी पक्ष्यांचे आगमन व वास्तव्य सुमारे ३ ते ४ महिने फार मोठ्या प्रमाणावर आपणास पाहावयास मिळते. यात निरनिराळी बदके, चिखले, क्रौंच, बलाक इत्यादी अनेक प्रजातींनी जलाशय व्यापलेला असतो. Asia Waterfowl Bureau तर्फे सन १९८७ साली प्रथमच आशिया देशातील स्थलांतरित पाणपक्ष्यांची गणना जानेवारी महिन्यात करण्यात आली होती. त्या सालच्या गणनेत १०० पाणथळींवर जवळजवळ दोन दशलक्ष पक्षी आढळून आले होते. यामध्ये भारतातील १६ राज्ये व एकूण १२२ पक्षी निरीक्षकांनी भाग घेतला होता. भारतातील एकूण १७२ पाणथळींवर ही गणना करण्यात आली होती व एकूण ६७६००० पक्ष्यांची नोंदणी झाली होती. यामध्ये ग्रेब, पेलीकन, कारमोरन्ट, स्टार्क, आयबीस, फ्लेमींगो, गीज, डक्स, क्रेन्स, रेल्स, कुट, वेडर्स, गल व टर्न या प्रजातींचा समावेश होता.

महाराष्ट्रातील एकूण १८ पाणथळींचा समावेश होता व या पाणथळी पुणे, सोलापूर, औरंगाबाद, अहमदनगर, नागपूर, नाशिक, सातारा, ताडोबा, मुंबई इत्यादी ठिकाणच्या होत्या. १९८७ सालच्या गणनेत एकूण ४८००० पक्ष्यांची नोंद झाली होती. प्रथम वर्ष असल्यामुळे प्रतिसाद कमी होता. पण नंतरच्या वर्षात वाढत गेला, असे निदर्शनास आले आहे. १९९४-९५ व ९६ सालासाठी एकत्रित अहवाल प्रसिद्ध झाला. त्यात आश्चर्याची गोष्ट म्हणजे ९५ व ९६ सालासाठी महाराष्ट्र गणनेचा अंतर्भाव झाला नव्हता. फक्त १९९४ सालच्या गणनेचा समावेश या अहवालात आहे. त्यानुसार एकूण ९७ पाणथळींचा समावेश असून एकूण २,७३,००० पक्षी इथे नोंदले गेले आहेत. त्यानंतरचे अहवाल मात्र उपलब्ध नाहीत. परंतु सन २००८ ते २०१५ च्या मोजणीची आकडेवारी Asian Wetland Bureau या साईटवर उलब्ध आहे.

वरील सर्व विवेचन हिवाळी पक्ष्यांच्या संबधित होते. पण पाणथळीवर हिवाळ्यात गणना करून नंतर वर्षभर त्याकडे दुर्लक्ष करावयाचे हे मला मान्य नाही. पाणथळीची स्थिती समजण्यासाठी वर्षभर या पाणथळीवर नजर ठेवून स्थानिक पक्ष्यांची पण नोंदणी व्हावयास पाहिजे. नांदूर-मध्यमेश्वर अभयारण्यात आमचे गाइड अशी नोंद ठेवीत असतात, हे मला नमूद करावयाचा आहे.

वरील उहापोह हा मुख्यतः पाणपक्ष्यांसंबंधी होता. पण मित्रहो पाणपक्ष्यांशिवाय अनेक प्रजातींच्या पक्ष्यांचे हिवाळ्यात आगमन होत असते. उदा. भोरड्या, बंटींग, वटवटे, गप्पीदास इत्यादी. परंतु यांची नोंद सध्या कोठेही होत नाही. तो मुद्दा पण आपण लक्षात घ्यावा असे मला वाटते.

महाराष्ट्राला मोठा समुद्र किनारा लाभलेला आहे व या किनाऱ्यावर मोठ्या संख्येने स्थलांतरित पक्षी येत असतात. त्यांचा समावेश झालेला दिसत नाही. दुर्दैवाने या गणनेस महाराष्ट्रातून अल्प प्रतिसाद मिळत असल्याचे आढळून आले आहे. परंतु आता IBA च्या माध्यमातून पाणपक्षी गणनेला चालना मिळालेली आहे. महाराष्ट्रातून एकूण २८ स्थाने ही IBA च्या यादीत आहेत. माझ्या माहितीप्रमाणे जानेवारी २०१७ मध्ये घेतल्या गेलेल्या पक्षी गणनेस अत्यंत अल्प प्रतिसाद मिळाला होता.

भारतात अनेक राज्यांत अशी गणला करण्यात येत असते. भारतातील सर्व राज्यांमध्ये महाराष्ट्राचा वाटा सर्वात मोठा आहे. परंतु स्वत स्वतंत्ररीत्या महाराष्ट्रातील गणनेची आकडेवारी व पाणथळींच्या यादी एकत्रितपणे संकलित केलेली नाही. त्यामुळे महाराष्ट्रातील जलाशयावर येणाऱ्या पाणपक्ष्यांची प्रजातीनुसार संख्या उपलब्ध नाही. सातत्याने काही वर्षे अशी गणना केल्यानंतरच पाणपक्ष्यांची आकडेवारी व त्या त्या पाणथळीची Eco-System याबाबत झालेले चढउतार यांचे अनुमान काढणे शक्य होईल.

या बाबत माझी अशी सूचना आहे की येत्या वर्षी जानेवारी १८ च्या गणनेपासून स्वतंत्ररीत्या महाराष्ट्रातील गणनेचे एकत्रितपणे संकलन व्हावे. यावरून आपणास महाराष्ट्रात कोणत्या प्रजातींचे किती पक्षी कोणत्या पाणथळीवर येतात हे समजून येईल. याबाबत सविस्तर चर्चा करून हे संकलनाचे काम योग्य त्या व्यक्तीकडे सोपवता येईल. या कामी मी सर्वतोपरी साहाय्य करण्यास तयार आहे.

याबाबत दुसरा मुद्दा हा आहे की या सर्व पाणथळींची आजची स्थिती, नैसर्गिक तसेच मानवी हस्तक्षेपामुळे या पाणथळींच्या परिसंस्थेची मोठी हानी होत आहे. उच्च न्यायालयाने याबाबत शासनास समिती स्थापण्याचे निर्देश दिलेले आहेत हे आपणास माहीतच आहे.

प्रत्येक ठिकाणच्या स्थानिक पक्षीमित्रांनी आपल्या भागातील पाणथळीं बाबत संशोधन करूज डाटा तयार करावयास पाहिजे. माझ्या असे निदर्शनास आले आहे की कित्येक ठिकाणच्या पाणथळी या आकसत चालल्या आहेत. जायकवाडी, उजनी, हतनूर यासारखे मोठे जलाशय सोडले वर शहरातील तलाव, छोटी धरणे, पाझर तलाव इत्यादी ठिकाणी तर उल्लेखलेली अतिक्रमणे वाढत आहेत. शेतीसाठी व पिण्याच्या पाण्यासाठी होणारा उपसा, त्याचबरोबर जलपर्णी, बेशरमी, रामबाण यांसारख्या वनस्पतींचे आक्रमण वाढत आहे. त्यामुळे जलपृष्ठ क्षेत्र कमी कमी होत आहे. परिणामी पक्ष्यांना भक्ष्यांचा तुटवडा जाणवत असल्याचे दिसून येते. मी उल्लेखलेल्या छोटी धरणे, पाझर तलाव, या

पाणथळीच्या जलाशयामध्ये नैसर्गिक पक्षी अधिवास संरक्षित करण्यासाठी प्रयत्न आवश्यक आहे. निसर्गाच्या अन्न साखळीत असलेले पक्ष्यांचे महत्त्व, पक्षी-प्रजातींच्या विविधतेचे परिसंस्थेशी असणारे नाते, वनामध्ये-शेतात परागसिंचनात असणारा वाटा यामुळे पक्षी अधिवासात होणाऱ्या बदलाकडे सजगपणे लक्ष देणे आवश्यक आहे.

BNHS ने सुमारे १० वर्षे केवलदेव घाना या अभयारण्याचा सर्वांगीण अभ्यास केला होता. त्याच धर्तीवर महाराष्ट्रातील जलाशयांचा अभ्यास होणे गरजेचे आहे. आपणास माहीतच आहे की भारतीय विद्यापीठ अंतर्गत १९९७ साली Inland wetland of India असा सर्व्हे केला होता. त्यामध्ये अनेक पाणथळींची यादी प्रसिद्ध केलेली होती. मला वाटते स्थानिक पातळीवर त्या त्या ठिकाणच्या महाविद्यालयाच्या साहाय्याने पक्षीमित्रांनी आपल्या परिसरातील पाणथळीबाबत अभ्यास करावा.

**सामाजिक वनसंर्धन क्षेत्र :-**

मी आपले लक्ष वनसंवर्धन कार्यक्रमांतर्गत ज्या नव्या संकल्पना अस्तित्वात येत आहेत, त्याकडे वेधू इच्छितो. पौराणिक व धार्मिक श्रद्धेतून कित्येक गावात देवराया जतन केल्याचे आपण पाहतो. कालौघात अशा देवराया सुद्धा नष्ट होत चालल्या आहेत, असे आपल्या अनुभवास येत आहे. या देवराया म्हणजे जैववैविध्याचा वस्तुपाठ आहे. देवरायाचे क्षेत्र कमी असले तरी तेथे जैववैविध्याची संपन्नता असते. अनेक कार्यकर्ते या देवरायांचे संरक्षण व संवर्धन यासाठी प्रयत्नशील आहेत. देवरायांसारखी राखीव वनक्षेत्र निर्माण करण्याची संधी आता शासकीय सहभागामुळे उपलब्ध होत आहे. ही संकल्पना म्हणजे सामाजिक वनसंवर्धन क्षेत्र (Social Conservation Reserve). याबाबत नाशिक जिल्ह्यात आता अस्तित्वात आलेल्या दोन वनसंवर्धन क्षेत्राची प्रगती आपणापुढे मांडू इच्छितो.

महाराष्ट्रात अनेक खेड्यागावालगतच वनखात्याचे क्षेत्र असते. असे क्षेत्र ५० ते १००/२०० एकरांपर्यंत अथवा त्यापेक्षा मोठे असू शकते. अशी क्षेत्रे विखुरलेल्या स्वरूपाची असतात. वनखात्याच्या दुर्लक्षामुळे या क्षेत्रावरील वृक्ष संपदेचा ऱ्हास झालेला आढळून येतो. त्यावर अतिक्रमण होत असते. अशा ठिकाणी अशी वनक्षेत्रे स्थानिक रहिवाशांना संरक्षित करण्यासाठी सोपवून जैववैविध्येचा दृष्टिकोनातून त्यांचा विकास होऊ शकतो.

असा प्रयोग नाशिक जवळील बोरगड या ३५० हेक्टर वनक्षेत्राचा विकास कार्यक्रम गेली १० वर्षे तुंगलदरा येथील स्थानिक व नेचर कॉन्झर्व्हेशन सोसायटी नाशिक यांनी राबविला आहे. शासनाने हे वनक्षेत्र सामाजिक वनसंवर्धन क्षेत्र म्हणूज जाहीर केले आहे. हा महाराष्ट्रातील पहिलाच नेचर कॉन्झर्व्हेशन रिझर्व्ह म्हणून शासकीय अध्यादेशाने मंजूर झाला आहे. या क्षेत्राची प्रगती कशी झाली याचे सादरीकरण मी ध्वनिफितीच्या माध्यमातून पुढील सत्रात करणार आहे.

कुऱ्हाड बंदी, चराई बंदी त्याचबरोबर वृक्ष लागवड या त्रिसूत्रींवर स्थानिकांच्या सहभागाने आज येथे समृद्ध वनक्षेत्र तयार झाले आहे. यात स्थानिकांना रोजगार व वनोत्पादने यांद्वारे फायदे मिळत आहेत. बोरगड येथील या यशस्वी प्रयोगाच्या वाटचालीतून प्रेरणा घेऊन नाशिक जिल्ह्यात दोन नव्या वनसंवर्धन क्षेत्रास शासकीय मान्यता मिळालेली आहे. ही क्षेत्रे म्हणजे येवला तालुक्यातील राजापूर - ममदापूर येथील ५४४५ हेक्टरचे काळवीट क्षेत्र आणि त्र्यंबकेश्वर जवळील अंजनेरी परिसरातील क्षेत्र. अंजनेरी येथे दुर्मीळ वनस्पती तसेच गिधाडांची घरटी व त्यांचे प्रजनन यांना संरक्षित क्षेत्रात सामील केलेले आहे.

**जखमी पक्षी :-**

गेले काही दिवस सातत्याने पक्षीमित्रांना एका समस्येला सामोरे जावे लागत आहे. ती समस्या म्हणजे जखमी पक्ष्यांची समस्या! विशेषतः मकर संक्राती सणाच्या पतंगोत्सवात ही समस्या मोठ्या प्रमाणात उत्पन्न होते. पतंगाच्या नायलॉन मांज्यामुळे अनेक पक्षी जखमी होतात, ही वस्तुस्थिती गावोगावीच्या पक्षी मित्रांना ज्ञात आहे. जखमी पक्ष्यांची सुटका व त्यांच्यावर उपचार ही समस्या प्रत्येक पक्षी मित्रास भेडसावत असते. दिवाळीतील मोठ्या आवाजाच्या फटाक्यांमुळे पक्ष्यांवर विपरीत परिणाम होतो. त्यातच वन्यजीव कायद्यानुसार त्यांच्या अडचणीतच भर पडत असते. अनेक वेळा कुठून कुठून नागरिकांचे जखमी पक्ष्यांबद्दल फोन येत असतात. महाराष्ट्रातील काही ठराविक ठिकाणी पक्ष्यांवर उपचार करण्याची सोय उपलब्ध आहे. परंतु ग्रामीण भागातील पक्षीमित्रांना उपचारांबाबत अनंत अडचणी येतात. जखमी पक्षी बरा होण्यास २/३ दिवस लागत असतील तर त्याच्या खाद्याची सोय करावी लागते. प्रत्येक प्रजातीची गरज भिन्न असल्याने तशी व्यवस्था करावी लागते. शिवाय वेळेवर योग्य उपचार व आहार न मिळाल्यास पक्षी गमावण्याची शक्यता जास्त असते.

मध्यंतरी श्री. भाऊ काटदरेंनी या बाबत एक निवेदन दिले होते. त्यावरुन या समस्येबाबत तोडगा काढण्याची आवश्यकता ध्यानी येईल. नाशिक पक्षीमित्र मंडळ व स्थानिक पक्षीमित्र यांनी मिळून चिफ कॉन्झर्वेटर ऑफ फॉरेस्ट यांची भेट घेऊन त्यांच्या समोर ही समस्या मांडली होती. चर्चेअंती वनखात्याने अशा जखमी पक्ष्यांवर उपचार करण्याचे मान्य केले. तसेच यासाठी ठिकठिकाणी रेस्क्यू सेंटर उभारण्यास मान्यता दिली आहे. त्यासाठी लागणारे Infrastructure लवकरात लवकर उपलब्ध करून देण्याचे आदेश दिले आहेत. पक्षीमित्रांनी स्थानिक वनविभागाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधून याबाबतची कार्यवाही करून घ्यावी. जखमी पक्ष्यांना प्राथमिक उपचार त्वरित मिळावेत यासाठी अशा उपचारांची माहिती देणारी व त्यासाठी लागणाऱ्या औषधांची नावे असलेली पुस्तिका प्रकाशित करावी याबाबत मागील संमेलनात चर्चा झाली होती.

त्याचप्रमाणे महाराष्ट्रात ठिकठिकाणच्या पक्षीमित्रांची आणि त्यांच्या संस्थांची सूची - फोन नंबर सहित तयार केल्यास एकमेकांशी संपर्क साधणे सोयीस्कर होईल.

जाता जाता मला पक्षीमित्रांना उत्साहित करणारी एक बाब निदर्शनास आणायची आहे. आपल्याला माहीतच आहे की रानपिंगळा या अत्यंत

(पृ.७ वर...)

## २० मार्च, आंतरराष्ट्रीय चिमणी दिन -

# चिमण्या आहेत! त्यांना जगण्याची संधी द्या!

भारतीय संस्कृतीत पर्यावरणाचा माणसाशी असलेला घनिष्ठ संबंध नव्याने सांगण्याची आवश्यकता नाही. बाळाला घास भरवताना आईचे 'एक घास काऊचा, एक घास चिऊचा' चालायचे आणि सोबत खरोखर चिऊताई असायच्या. त्यांच्या चिमण्या हालचाली, त्यांचे चिमणे रूप, त्यांचे चिमणे बोल बालकांना फूट दोन फूट अंतरावरून अनुभवता येत असे. एकट्या बाळाच्या सभोवतीची शितं चिमण्याच फस्त करत असत. चालणारे दुडूदुडू धावणारे बाळ चिमण्यांभोवती फिरत असे. बाळलीलांना उल्लेखताना 'चिमणेबोल' सारख्या उपमा दिल्या जत असत. चिमण्या आमच्या अंगणात रहात असत. गावाभोवतीच्या खळ्यात त्यांची यात्रा भरत असे. गावकुसाभोवती चिमण्या भिरभिरत असत. अश्या या चिमण्या गेल्या कुठे? त्यांना काय झाले? त्या का रागावल्या? असे प्रश्न आता ज्येष्ठ नागरिकांना भंडावतात. चिमण्यांच्या आठवणीने ते उदास होतात.

चिमणीचे जीवशास्त्रीय नाव Passer domesticus असे आहे. भारतीय उपखंडात चिमणी सर्वत्र खेडी, बागा आणि शेती प्रदेशात आढळते. चिमणी मानवाच्या आसपास राहणे पसंत करते. मानवास उपद्रवी नसलेला हा पक्षी नर मादी असा जोडीने राहतो. चिमणा आरशावर टोची मारताना दिसतो. आरशातील प्रतिमेस तो दुसरा चिमणा समजून असे करत असावा. चिमण्यांचे आवडते खाद्य म्हणजे अळ्या. मात्र त्या प्रामुख्याने गवताच्या किंवा धान्याच्या बिया खातात. ज्वारी, बाजरी, तांदूळ त्यांचे उत्तम खाद्य आहे. प्रसंगी चिमण्या मुरमुरे, उरलेल्या अन्नाची शितं खातात. घेवडा, एरंडी, मका यांच्या टणक आणि जाड बिया, वाळलेली कडक भाकरी, टणक टरफलांची फळे चिमण्यांना खाता येत नाहीत. अस्वच्छतेतील आणि दुर्गंधीतील खाद्य चिमण्या टाळतात.

कोणतेही पक्षी मुबलक खाद्य उपलब्ध असण्याच्या काळात सुरक्षित स्थळी वीण घालतात. चिमणा चिमणी दोघे मिळून सुरक्षित जागी घरटे बनवतात. चिमण्या धाब्यांच्या घरात लाकडांच्या फटीत, भिंतीस तिरप्या तसबिरींच्या आड, अंगणातील झाडाझुडूपात, बांबूच्या बेटात, परसबागेत घरटी बांधतात. मोठ्या वृक्षावर चिमणीचे घरटे नसते. त्यांचे घरटे गवताची पाती, चिवट्या, दोरे, कापसाचे तंतू, प्रसंगी छोट्या चिंध्या किंवा पक्ष्यांच्या पंखांचे पर यांचे बनलेले असते. चिमणी घरट्यात एका वेळेस तीन ते सहा अंडी घालते. दोघे मिळून अंडी उबवतात. पिलांना चोचीने भरवतात वंशसातत्याचा तो एक नैसर्गिक आविष्कार असतो.

चिमण्या कमी का झाल्यात याविषयी विस्तृत अभ्यासाची आवश्यकता आहे. चिमण्या काहीश्या मानवाच्या आसपासच वावरताना आढळतात. त्या मानवी वस्तीचा आधार घेतात. आसमंतात असलेल्या विविध कंपनांच्या परिणामी चिमण्यांची संख्या घटली असावी, असा एक समज आहे. त्यासाठी मोबाईल मनोऱ्याप्रती साशंकता व्यक्त होते. परंतु असा काही परिणाम चिमण्यांवर होत असल्यास इतरही प्राणीमात्रांवर, विशेषतः चिमणीच्या आकाराच्या दुसऱ्या पाखरांवरही तो झाला असता. तसा परिणाम मधमाशीवर सिद्ध झाला आहे. चिमण्यांबाबत तसे वाटत नाही. प्रदूषणाच्या परिणामी-विषारी बिया, अळ्या, दाणे खाल्याने चिमण्या मरत असाव्यां. असेच एक महत्त्वाचे कारण म्हणजे मानवाच्या आधुनिक जीवनशैलीने चिमण्यांचा अधिवास अडचणीत आला. आता माणसाच्या घरात चिमण्या घरटे बांधू शकत नाहीत. आधुनिक घरात चिमणीसाठी वळचणीची जागाच नाही. घरांना झुडूपे-वेली यांचे अंगण नाही. त्यामुळे चिमण्यांना घरटे बांधण्यास अनुकूल जागा नाही. दुसरे महत्त्वाचे कारण म्हणजे माणसांच्या घरात चिमणीचा प्रवेश म्हणजे चिमणीचे हमखास मरण. छताच्या पंख्यात अडकून एका फटक्यांत चिमणी गतप्राण होते. थोडक्यात मानवाच्या आसपास वावरणारी चिमणी, मानवाच्या आधाराने वाढणारे तिचे कुटुंब आता काहीसे बेवारस झालेले आहे. गावपरिसरात शेती परिसरात बांबूची बेटे नाहीत. अनुकूल निवारा नाही, प्रतिकूल वातावरण आहे. त्यामुळे चिमण्यांची संख्या कमी झाली आहे.

चिमणीची आणखी महत्त्वाची एक सवय म्हणजे त्या वाहत्या उथळ पाण्यात 'जलस्नान' करतात. नाईलाजास्तव डोहाच्या काठाने जलस्नान करतात. मात्र पाणी स्वच्छ आणि योग्य तापमानाचे हवे, जे आता दुर्मीळ आहे. तसेच चिमण्या टणक, सपाट जागी किंचित वाळू अंश किंवा धूळ असलेल्या जागी 'धूळस्नान' करतात. ती त्यांची नियमित गरज आहे. पूर्वी सारवलेली अंगणे चिमण्यांची ही गरज भागवत असत. आता सर्वत्र अंगणात हरळी किंवा कॉंक्रीटचे तळ असते. मग चिमणीने धूळस्नान कोठे करावे?

**चिमण्यांची संख्या वाढविण्यासाठी काय करावे?**

आपल्या घरातील सर्वांनाच आवडणारी चिमणी राहील कोठे? खाईल काय? घरटे कोठे बांधणार? तिचा संसार कोण सहन करणार? या सर्व प्रश्नांची उत्तरे शांत डोक्याने द्यावी लागतील. खरेतर वाढत्या नागरीकरणामुळे उघड्या जागांवर अतिक्रमण होत आहे. या ओपन स्पेसेस खरोखर ओपन ठेवल्या पाहिजेत. शहर तेथे वेली, झुडूपे, वृक्षांच्या बागा तयार केल्या पाहिजेत, त्या जोपासल्या पाहिजेत म्हणजे मानवासह इतर सजीवांचा गोतावळा टिकेल. आपल्या घरात येणाऱ्या चिमणीसाठी काही विशेष कोपरा, कोनाडा अशी जागा घरात ठेवली पाहिजे. घराच्या जिन्याचे छत त्यासाठी सुरक्षित आहे. मात्र चिमणीस पंखा असलेल्या खोलीत येण्याची आवश्यकता पडू नये. चुकून चिमणी घरात आल्यास त्वरित पंखा बंद करावा. चिमणी बाहेर पडेपर्यंत पंखा बंद ठेवून दरवाजा खिडक्या उघड्या ठेवाव्यात. खिडकीस बारीक (डासांसाठीच्या) जाळ्या असल्यास घरातील चिमणीस ते कळत नाही. अशावेळी खिडक्या बंद कराव्या. दिवे बंद करून अंधार करावा आणि दरवाजा उघडावा म्हणजे चिमणी उघड्या दरवाजातून बाहेर जाते.

कोणत्याही परिस्थितीत चिमणीस बाहेर काढण्यासाठी पकडण्याचा किंवा हाकलून लावण्याचा प्रयत्न करू नये. तसे केल्यास चिमणीची दमछाक होते. ती भीतीने मृत्युमुखी पडू शकते. आपण संयम ठेवावा, इतर कामात आपले लक्ष गुंतवावे. चिमणी तिच्या घरटे बांधताना काही तंतू पडून कचरा होतो. म्हणून चिमणीस हुसकावून लावू नये. घरटे बांधून चिमणा चिमणीचा मुक्काम सुरू झाल्यास ठराविक जागी त्या नेमाने बसतात. त्या जागी शिटतात त्याचा तिटकारा येतो. चिमणी नकोशी होते. थोडी काळजी घ्या. त्याजागी कागद ठेवा, उचलून फेका स्वच्छता नांदेल.

आपल्या घराजवळ अंगणात चिमण्या कोठे दिसतात का? निरीक्षण करा. आढळल्यास त्यांच्या चारापाण्याची व्यवस्था करा. त्यासाठी बाजरी, ज्वारी, गहू, मुरमुरे, पोळीचा किंवा भाकरीचा चुरा, इतर धान्यातील चुरा वापरावा. उन्हाळ्यात पक्ष्यांना पाणी पिण्यासाठी आणि आंघोळीसाठी उथळ भांड्यात पाण्याची व्यवस्था करावी. हे पाणी एक-दोन दिवसात बदलावे. चिमण्यांच्या चारापाण्याच्या ठिकाणी मांजरी कुत्रे येणार नाहीत अशी काळजी घ्यावी. मांजरी पाखरांच्या घरट्यातील अंडी, पिले पळवतात. त्याकडे लक्ष द्यावे. चिमणीस समजून घ्यावे. 'एकमेका सहाय्य करू' असा सहकाराचा मंत्र जपणारा मानव निसर्गाप्रती सहकार्याची भूमिका टाळतो की विसरतो याचा विचार व्हावा.

– विक्रम पाटील

मो. ९९७०२२५५३८

## ३१ व्या महाराष्ट्र राज्य पक्षीमित्र संमेलनाचे अध्यक्ष श्री. दत्ताजी उगांवकर यांचे अध्यक्षीय मनोगत

(पृ.५ वरून...)

दुर्मीळ पक्ष्याचे वास्तव्य मेळघाट, नंदूरबार या शिवाय महाराष्ट्राच्या दक्षिण भागात पण दिसून आले आहे. नेचर कॉन्झर्वेशन सोसायटीचे श्री.राहा यांना पेठ हरसूल या भागात आतापर्यंत तीन पक्षी आढळून आले आहेत. त्याचा पाठपुरावा चालू आहे. त्याचप्रमाणे तानसा अभयारण्यात श्री. सुनिल लाड व रोहीदास यांना हा पक्षी आढळून आल्याचे प्रसिद्ध झाले आहे.

माझ्या, वरील भाषणात जे मुद्दे मांडले आहेत त्यावर सविस्तर चर्चा करून महाराष्ट्र पक्षीमित्र संघटनेने योग्य तो निर्णय घ्यावा अशी माझी त्यांना विनंती आहे. या संमेलनाचे अध्यक्षपद देऊन, माझे विचार मांडण्याची संधी दिली याबद्दल सर्वांना धन्यवाद!

## स्वागत नव्या सभासदांचे (२० ऑगस्ट २०१७ ते ३ डिसेंबर २०१७)

| क्र. | नाव | जिल्हा | फोन नं. | e-mail |
|---|---|---|---|---|
| १००६ | डॉ. दिनेश शिवराम धर्माधिकारी | कोल्हापूर | ९६२३४७६६९३ | dinesh416114@gmail.com |
| १००७ | श्री. सुरेश वसंत चिबडे | सांगली | ९७३०४३८६८८ | sureshch8688@gmail.com |
| १००८ | श्री. संदीप पंढरीनाथ सोनावणे | नाशिक | ७०२८०७०९५२ | - |
| १००९ | श्री. मिहीर प्रकाश लिडबिडे | पुणे | ८३०८६०३४३४ | mihirlidbide007@gmail.com |
| १०१० | श्री. प्रकाश दिनकर लिडबिडे | पुणे | ९३२६६४७६५७ | pralid@gmail.com |
| १०११ | श्री. शशांक रामचंद्र मनोहर | मुंबई | ९८२०६९३२२५ | shashank_manohar@yahoo.com |
| १०१२ | श्री. संजय जांबेकर | ठाणे | ९९६०५६२००७ | sbjambekar@yahoo.com |
| १०१३ | तेजस्विनी नीलकंठ मैंद | मुंबई | ९३२३२३३७७४ | tmaind@gmail.com |
| १०१४ | श्री. लक्ष्मीकांत राजाराम नेवे | जळगाव | ७५८७७४०६६१ | lakshmikant.bird@gmail.com |
| १०१५ | श्री. जयंत परमानंद अत्रे | यवतमाळ | ९४२०२४३००० | jpatrey@gmail.com |
| १०१६ | श्री. रविंद्र भागवत | ठाणे | ९९३०४६२२८८ | rrbhagwat@gmail.com |
| १०१७ | डॉ. नीलम खानोलकर | ठाणे | ९८३३९३१२५७ | neelam.khanolkar@gmail.com |
| १०१८ | डॉ. हेमालथा रामचंद्रन | ठाणे | ९८९२७३५७६१ | hema_6362@yahoo.com |
| १०१९ | श्री. वीरेंद्र घरात | ठाणे | २५३६२३४२ | vsgharat@yahoo.co.in |
| १०२० | श्री. विलास कृष्णराव कैटकर | मुंबई | ९८२०३१६५२० | vilas.kaitkar@gmail.com |

# विष्णू जलाशय - एक अदभुत पक्षी अभ्यास केंद्र

कोल्हापूर जिल्ह्यातील हातकणंगले तालुक्यातील वारणा नदी खोऱ्यात वसलेलं छोटसं गाव म्हणजे तळसंदे होय. नावातच मूळ तळ हा शब्द असल्याने तळसंदे हे नाव पडले आहे. केदार विजय या ग्रंथामध्ये २८ व्या अध्यायामध्ये या गावचा उल्लेख आहे. गावची ख्याती ही गावात असणाऱ्या एका जलाशयामुळे आहे. तो जलाशय म्हणजे विष्णू जलाशय होय. त्याला दुसरेही नाव आहे ते म्हणजे अगस्ती तलाव. हे नाव का पडलं त्याची थोडक्यात आख्यायिका अशी.....

उत्तर भारतातून विंध्य पर्वतराजी पार करून अगस्त्य ऋषी दक्षिण भारतात येत होते. वाटेत त्यांना तळसंदे गाव दिसले. या ठिकाणी ऋषींनी फार काळ वास्तव्य केले. तदनंतर त्यांनी श्री. शेषशाई भगवान् विष्णू व शिवलिंगाची प्रतिस्थापना केली. विष्णू मंदिर जलाशयाच्या मधोमध तर शिवलिंग हे काठावर आहे. या दोहोमधील अंतर शंभर बाणांचे आहे. (एक बाण म्हणजे साडे चार फूट होय) तसेच या दोन मंदिराला जोडणारी एक गुहा आहे असे म्हणतात. याचा वापर ऋषी मुनी ज्ञान साधना करण्यास करत.

कोल्हापूर संस्थानचे राजे श्रीमंत शाहू महाराज यांनी जलाशय परिसर हरिणांच्या शिकारीसाठी राखीव ठेवला होता अशी माहिती आहे. असा हा ऐतिहासिक व पौराणिक वारसा लाभलेला विष्णू जलाशय अलिकडलील दोन-तीन वर्षीपासून आढळणाऱ्या विविध जातीच्या पक्ष्यांच्या वैविध्यतेने जिल्ह्यातील रंकाळा, कळबा, पानस्थल ठिकाणांना जेवढे महत्व आहे तितकेच या जलाशयाला पक्ष्याच्या दृष्टीने महत्व प्राप्त होऊ लागले आहे. या जलाशयावर स्थानिक व स्थलांतरित पक्षी मोठ्या प्रमाणावर दिसत असल्याने पक्षिमित्रांना एक छोटसं पक्षी अभ्यास केंद्र म्हणून नावारूपास येत आहे. आत्तापर्यंत जवळजवळ पन्नासहून अधिक पक्षी नोंद झाले आहेत.

फ्लेमिंगो (अग्निपंख) हा प्रथम जानेवारी २०१५ मध्ये जलाशयावर नोंद झाला. त्याची अवकाशातील उंच भरारी, लांबच्या लांब पसरलेले अवाढव्य पंख, त्यातील आग लागल्यासारखा दिसणारा लाल रंग, बाकदार जाडजुड चोच असा हा पक्षी एक दिवसाचा पाहुणा जलशयाचा अभ्यास दौरा करून गेला. वाटले पुढच्या वर्षी परत भेट देईल पण आला नाही. ब्लॅक आयबीस(काळा अवाक) जुलै २०१५ मध्ये अठरा संखेने नोंद झाला. गवताळ प्रदेशात खाद्याच्या शोधात दिसले. दक्षिणेकडील बाजूस असणाऱ्या नीलगिरी वनात विशिष्ट प्रकारचा आवाज करत असताना ट्री पाय (टकाचोर) पक्षी थोड्या कालावधीसाठी भेट देऊन गेला. ऑगस्ट २०१५ मध्ये एक चमचचोचा(स्पूनबिल) हा देखील प्रथमच नोंद करण्यात आला. त्यानंतर तो चौदाच्या संख्येने दिसू लागला.

पेंटेड स्टॉक हा पक्षी ही प्रथम सात-आठ संख्येने दिसले. ब्रॉन्झ विंग्ड जकाना हा पाणपक्षी जलाशयाच्या काठाने ओल्या गाळात खाद्य शोधत असताना दिसला. अजूनही अधून मधून कधीतरी दर्शन देतो. हा जलाशय भौगोलिक रचनेनुसार समृद्ध आहे. वर्षभर पाणी संपत नाही. कडक उन्हाळ्यात पाळीव जनावरे नागरिकांना कपडे धुण्यासाठी, विशेषतः पक्ष्यांसाठी पिण्याच्या पाण्याची चांगली सोय होते. त्यामुळे उन्हाळ्यात बगळे, टिटव्या, स्पॉट बिल, हेरॉन, होला, कावळे, सुगरण, नाम्या बदक यासारखे विविध पक्षी भरपूर प्रमाणात पाण्याच्या कडेला स्नान व खाद्य शोधताना दिसतात. पूर्वेला ग्लिरिसिडियाची हिरवीगार राई, दक्षिणेला निलगिरी व बाभूळ, नारळ, वड पिंपळ यांची घनदाट वृक्ष राजी आहे. तसेच जलाशयाचा बराच भाग उघडा माळरान प्रदेश आहे. यावरती पावसाळ्यात हिरवेगार गुडाघाभर उंच गवत उगवते. पावसाळ्यात जलाशयाचा भूप्रदेश जणू हिरवा शालू परिधान केल्यासारखा दिसतो. गवत जसजसे वाढेल तसतसे तित्तर पक्ष्यांच्या आवाजाने सर्व परिसर दणाणून जातो, निसर्गातील हालचालींना वेग येतो. साधारणपणे ऑगस्टपासून गवताळ प्रदेशात तित्तर, लाव्हा, अ‍ॅशी प्रिनिया, वार्बलर, बुस्चाट, वॅगटेल, यासारखे पक्षी घोंगावताना दिसतात. नाग, धामण, वॉटर स्नेक, हे सर्प तर सरडे, घोरपड, यासारखे सरपटणारे प्राणी, ग्रास यलो बटरफ्लाई, मॉरमॉन, झेझेबल, यासह विविध जातींची फुलपाखरे देखील भटकंती दरम्यान दिसतात.

जलाशय परिसरात काटेरी बाभूळ, नीलगिरी, पळस, कोकोनट ट्री,



बोर (Ziziphusp.), वड, पिंपळ, टायफा (पानकणीस), बेशरमी (आयपोमिया), सागवान, ग्लिरिसिडिया आदी वृक्ष राजी आहे. जलाशय परिसरात गवतातील लहान मोठे कीटक, उंदीर, अळ्या, सरडे खाण्यासाठी सावजावर टपून बसलेले कापसी घार, कोतवाल, वेडा राघू, वार्बलर, खाटिक ह्या पक्ष्यांची झुबड उडताना दिसते. दक्षिणेकडील बाजूस ऊस शेत परिसरात तर मोरांचे म्याओ म्याओ असा आवाज कायमच ऐकायला मिळतो. एकूणच विष्णू जलाशयाचा सर्व परिसर हा पक्ष्यांच्या किलबिलाटासह पक्षीमित्रांना पक्षिनिरीक्षणाची हौस भागवतो. सायंकाळच्या वेळेस साडे पाच नंतर शेकडो बगळे व कावळे जलाशयाच्या मुख्य बंधाऱ्यावरील वृक्षराजीत विश्रांती घेण्यासाठी एकत्रित जमतात.

चावरे (ता. हातकणंगले) येथील पक्षी अभ्यासक युवराज पाटील

यांनी या ठिकाणी भेट देणाऱ्या विविध पक्ष्यांच्या नोंदी ठेवण्याचे काम गेली तीन चार वर्षयापासून सुरू केले आहे. त्याचबरोबर विवेकानंद फाऊंडेशन व बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीच्या वतीने या जलाशयावर दोनशेच्या वर पक्षी व जवळ जवळ पस्तिस्च्यावर जातींच्या पक्ष्यांची नोंद केली आहे. तसेच या ठिकाणी पक्ष्यांना खाद्य, निवारा मिळावा म्हणून वड, पिंपळ, उंबर, आदी झाडी विवेकानंद फाउंडेशन या स्वयंसेवी संस्थेने लावली आहेत. तसेच याठिकाणी स्पॉट बिल, नाम्या बदकांची संख्या भरपूर असलेने स्थानिक अज्ञात लोकांच्याकडून चोरटी शिकार होते. अश्या घटनांवर लक्ष्य ठेऊन आहोत. एकूणच हा जलाशय पक्ष्यांच्या विविध जाती-प्रजातींसाठी एक संवेदनशील पक्षीक्षेत्र म्हणून नावारूपास येत आहे.

विवेकानंद फाउंडेशन परिसरातील विविध शाळांमध्ये गावातील जवळ असणाऱ्या नदी व तलाव शेती परिसरात निसर्ग अभ्यास सहली व पक्षी निरीक्षण शिबिर कार्यक्रम आयोजित करते. यातून मुलांच्या मध्ये पर्यावरणाविषयी, निसर्गाविषयी पक्ष्याच्या विषयी आवड निर्माण करण्याचे काम करत आहे. विवेकानंद फाउंडेशनने 'निसर्ग अभ्यास केंद्र' तयार करण्याचे ठरविले आहे. एकूणच विष्णू जलाशय एक पक्षी अभ्यास केंद्र म्हणून नाव लौकिक मिळवेल. हा विष्णू जलाशय ग्रामीण भागातील संवेदनशील 'पाणस्थळ पक्षी' (wetland bird) अधिवास क्षेत्र म्हणून महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहे. भविष्यात हे ठिकाण अभ्यास केंद्र तसेच एक छोटं मानव निर्मित पक्षी अभयारण्य म्हणून विकसित करण्यास विवेकानंद फाउंडेशनच्या माध्यमातून ग्रामपंचायत व वन्यजीव विभाग मार्फत पाठपुरावा करत आहे.

– श्री. युवराज पाटील
नवे चावरे
निमंत्रित सदस्य कोल्हापूर जिल्हा

## स्वागत नव्या सभासदांचे

| क्र. | नाव | जिल्हा | फोन नं. | e-mail |
|---|---|---|---|---|
| १०३१ | सौ. मेघना दर्शन शहा | ठाणे | ९८३३३५९९९४ | meghanasmail@gmail.com |
| १०३२ | श्री. रविंद्र सदाशिव साठ्ये | ठाणे | ९८१९४६८६८८ | - |
| १०३३ | श्री. प्रवीण नायक | मुंबई | ९८६९०७१३०० | pravinnayak3@gmail.com |
| १०३४ | श्री. शशिकुमार मेनन | मुंबई | ९८२१५४१७७६ | drsasikumarmenon@gmail.com |
| १०३५ | श्री. प्रकाश माळी | मुंबई | – | prakashmali69@gmail.com |
| १०३६ | श्री. बिपीन धुमाळे | मुंबई | ९३२४७६०८९७ | dhumalebipin@gmail.com |
| १०३७ | मानसी मि. आमडेकर | ठाणे | ९८३३९९६८३३ | manasiamdekar@gmail.com |
| १०३८ | श्री. संजय मधुकर प्रभुघाटे | ठाणे | ९८२०६३६२४५ | smprabhughate66@gmail.com |
| १०३९ | श्री. धनंजय वामन देशपांडे | ठाणे | ९८३३१९४८६५ | dhvade2005@yahoo.com |
| १०४० | श्री. मनोहर संखे | पुणे | | manoharsankhe34@gmail.com |
| १०४१ | आशा छगनलाल दर्डा | ठाणे | ९८९२०७१९९४ | - |
| १०४२ | श्री. राजेंद्र वसंतराव देवरे | नाशिक | ९८९०१४३००७ | - |
| १०४३ | डॉ. आशीर्वाद ठाकूर | ठाणे | ९८६७३७०४५५ | drashirwad@yahoo.com |
| १०४४ | डॉ. पराग नलावडे | मुंबई | ९७६६६२७५६६ | nalawadeparag@yahoo.in |
| १०४५ | श्री. श्रीकृष्ण पाटील | औरंगाबाद | ८०५५४१६४४४ | shrikrishnapatil123@gmail.com |
| १०४६ | श्री. राजेंद्र बाबुराव डुमणे | औरंगाबाद | ८८०६७७७४७७ | rdumane7@gmail.com |

## त्रैमासिक अंक निधी

| क्र. | नाव | पत्ता | रक्कम | दिनांक | पावती क्र. |
|---|---|---|---|---|---|
| १ | डॉ. विजय तुळजापूरकर, डॉ. विनोद भागवत | मिरज | १०५० | २ डिसेंबर २०१७ | २४४० |

# वेड लावले जिवाला या पाखराने !

३० दिवसांच्या विपश्यना शिबिरासाठी धम्मगिरी, इगतपुरीला गेलो होतो. मे, जून महिने होते. दीर्घ शिबीर असल्याने ते तपोवनमध्ये होते. शिबीरार्थींची संख्या थोडी जास्त होती. त्यामुळे काही पुरुष शिबीरार्थींची व्यवस्था मध्ये मोठा पडदा टाकून महिला विभागाकडे केली होती. माझे निवासस्थान या भागात होते. भोजनालय, शून्यागार व धम्मकक्षाकडे जाताना दूरचा रस्ता घेऊन जावे लागे.

शिबिराचा तिसरा-चौथा दिवस असेल. सायंकाळची ५-६ ची वेळ. भोजनालयाकडून निवासस्थानाकडे चाललो होतो. रस्त्यात शिबीर कार्यालय लागते. कार्यालयाच्या वर पाणी तापवण्याची सौर टाकी. त्यावर एक उभी-आडवी होली क्रॉससारखी उंच लोखंडी पट्टी होती. त्यावर बसून एक अत्यंत सुंदर पक्षी गोड गाणे गात होता. तसा पक्षी आणि तसे गाणे मी पहिल्यांदाच ऐकत होतो. तो केवळ ५/१० मिनिटेच बसून भुर्कन उडून गेला असे झाले नाही, तर तो चक्क २५/३० मिनिटे एकाच जागेवर बसून उंच आणि गोड आवाजात गात होता.

तपोवनमधील ती सर्वात उंच जागा होती. त्यावर बसून याचे हे गाणे. इतक्या उंचावर बसलेला तो बादशहाच वाटत होता. बादशहा नव्हे शहेनशहा, सम्राट वाटत होता. तपोवन परिसराचा तो सम्राटच होता. त्याच्या पहिल्याच दर्शनाने आणि आवाजाने मी बेभान झालो.

३० दिवसांच्या शिबिरात पूर्ण मौन पाळायचे असते. फक्त मौन नाही तर आर्य मौन. आवती-भोवती, झाडावर अशा प्रकारे माकडासारखे पाहायचे नसते. परंतु त्या पक्ष्याला पाहण्याचा आणि ऐकण्याचा मोह मला काही केल्या आवरत नव्हता. त्याच्या नंतरचा दिवस. सकाळची वेळ. मी माझ्या खोलीमध्ये होतो. आवाज कानावर आला. ओळख पटली. खोली बाहेर आलो. हे महाराज कालच्याच जागेवर बसून गात होते. तितकाच वेळ. संपूर्ण तपोवनमध्ये आवाज पोहोचत होता. आता रोज सकाळ, संध्याकाळ हे घडू लागले. माझी घालमेल होऊ लागली. एखाद वेळ त्याला पाहिले, ऐकले तर ठीक. परंतु त्याला असे रोजच पाहणे, ऐकणे शिबिराच्या शिस्तपालनात बसत नव्हते. शिस्तभंग होत होता. मोह तर आवरत नव्हता. आता काय करावे? मोठा पेच निर्माण झाला. माझा मीच पेच सोडवला. सम्राटला मी अपवाद केला. दिवसभरातून किमान एकदातरी त्याला पहायचे आणि ऐकायचेच असे ठरवले.

असे करत करत ३० दिवसांचे शिबीर संपत आले. ३० दिवसांच्या शिबीराबरोबरच ४५ दिवसांचे शिबीरपण चालू होते. मी विनंती केल्याने गुरुजींनी मला १५ दिवस वाढवून देऊन ४५ दिवसीय शिबिराला बसण्याची परवानगी दिली. सम्राटसाठी शिबीर वाढवून घेतले नव्हते. आता माझे निवास बदलले. ते शिबीर कार्यालयाच्या पाठीमागे आले. सम्राट तर आता जणू डोक्यावर बसूनच गातोय असे वाटू लागले. त्यात आणखी एक विलक्षण बदल झाला. माझ्या आत्ताच्या खोलीसमोरच थोडया अंतरावर एक मध्यम ऊंचीचे झाड होते. त्याच्या बुंध्यापासून पुरुष दीड पुरुष उंचीवर ढोलीमध्ये एक खोबण होती. गुहाच होती म्हणाना ती! ही खोबण म्हणजेच आपल्या सम्राटाचे निवासस्थान असल्याचा शोध मला लागला. आता मी तर अगदी हरखूनच गेलो.

सम्राट अगदी माझ्या जवळ जवळ येऊ लागला. त्याच्या निरीक्षणात माझा जास्त वेळ जाऊ लागला. एवढेच नाही तर आता त्याच्या बरोबर त्याची जोडीदारीण पण दिसू लागली. घरट्यात एकजण गेले की दुसरे घरट्या बाहेर राखण करत असे. आत गेलेला बाहेर आला की बाहेरचा आत जात असे. आतला बाहेर येऊन राखण करत असे. खालून खारुताई वर चढू लागली तर तिला पिटाळून लावले जात होते.

हळू हळू त्यांच्या या सर्व कृतींचा मला अर्थ लागू लागला. पाण्याच्या टाकीवर बसून अर्धा अर्धा तास हे महाराज गात होते म्हणजे आपल्या जोडीदारणीला साद घालत होते तर! घरट्याबाहेर बसून आळीपाळीने एकेक जण राखण करीत होते म्हणजे आत अंडी पिलांना गादी बनवण्याचे काम चालू असावे.

बाणाकृती पट्टीवर बसलेल्या सम्राटला पहाणे आणि ऐकणे चालू होते. त्याचे गीत मी आतापर्यंत ऐकलेल्या कोणत्याही पक्षाच्या गीतापेक्षा सर्वोत्कृष्ट गीत होते. कोकीळपेक्षा किती तरी पट गोड. त्यांच्या घरट्याचे, आत बाहेरच्या हालचालींचे निरीक्षण करता करता ४५ दिवसांचे शिबीर पण संपले.

मी घरी आलो आणि सम्राटला विसरुन गेलो. आणि डिसेंबर, जानेवारी, फेब्रुवारी मध्ये मी पुन्हा ४५ दिवसांच्या शिबिराला आलो. आता सम्राट दिसत होता परंतु त्याची ती शान नव्हती. बाणाकृती उंच पट्टीवर तो बसतच नव्हता. गातही नव्हता. त्याची जोडीदारीण पण दिसत नव्हती. घरटे पण नव्हते. तो अत्यंत साध्या पक्ष्याप्रमाणे फक्त चरताना दिसत होता. परतच्या ४५ दिवसांच्या शिबिरात मी त्याला एकदा पण गाताना ऐकले नाही. मग त्यांच्या या कृतीचा मला हळूहळू उलगडा झाला. मे, जून म्हणजे त्यांच्या विणीचा हंगाम असावा.

– कल्याण कदम
१५५, विज्ञा कॉलनी, कल्याण रोड, अहमदनगर
मो. ९४२३४२०३२७

## मानद वन्यजीवरक्षक

गेल्या अंकात ज्या पक्षीमित्र सदस्यांची नियुक्ती मानद वन्यजीवरक्षक म्हणून झाली आहे त्यांची यादी प्रसिद्ध केली होती. त्यात श्री. अमित खरे यांचे नाव राहून गेले होते. नाशिक जिल्ह्यातील मालेगावचे आपले सदस्य श्री. खरे यांची नाशिक जिल्ह्यासाठी मानद वन्यजीवरक्षक अशी नेमणूक झाली आहे त्यांचे अभिनंदन!

# वनीकरणामुळे गवताळ प्रदेशांचे अस्तित्व धोक्यात

भारत हा वन्यजीव समृद्ध देश आहे. पश्चिम दिशेकडचा सह्याद्री आणि हिमालयाच्या रांगा वनस्पती, प्राणी व पक्ष्यांच्या अनेक जातींनी भरून गेल्या आहेत. गर्द झाडी, जंगले, उंच हिरवेगार डोंगर निसर्गप्रेमींना नेहमीच साद घालत आले आहेत. भारतामध्ये गवताळ प्रदेशांना सुद्धा काही कमी नाही. परंतु उंच वृक्ष आणि गर्द झाडी यांच्या अभावामुळे गवताळ प्रदेशांकडे काही वेळा दुर्लक्ष होते.

गवताळ प्रदेश हे कमी पावसाच्या भागांमध्ये दिसून येतात, जिथे पावसाचे प्रमाण वाळवंटा इतके कमी नसते व जंगला इतके जास्त नसते. पृथ्वीचा एक चतुर्थांश भाग हा गवताळ प्रदेशांनी व्यापलेला आहे. आफ्रिकेमध्ये गवताळ भागांना सवाना तर दक्षिण अमेरिकेत गवताळ भागांना पंपास म्हटले जाते व दिसायला रुक्ष असले तरी गवताळ प्रदेशांची स्वतःची अशी परिसंस्था (Ecosystem) असते. गवताळ प्रदेशांमध्ये आढळणारे प्राणी, पक्षी, कीटक हे बरेच वेगळे आणि गवताळ प्रदेशांमध्ये जीवन जगण्यासाठी उत्क्रांत झालेले असतात.

भारतामध्ये दखखनचे पठार, महाराष्ट्र, गुजराथ, राजस्थान व इतर काही राज्यांमध्ये गवताळ प्रदेश दिसून येतात. महाराष्ट्रामधील गवताळ प्रदेश हे शुष्क गवताळ प्रदेश म्हणून ओळखले जातात. अशा गवताळ प्रदेशांची एक खास जैवविविधता (Bio-diversity) असते. माळढोक, धाविक, टिटवी, चकोर, चंडोल, मोर, तितर आणि बरेच शिकारी पक्षी या गवताळ भागामध्ये वास्तव्य करतात. याशिवाय फुलपाखरे, साप, सरडे, सापसुरळी, बेडूक आणि कीटकांच्या हजारो जाती या गवताळ प्रदेशांमध्ये दिसून येतात.

गवताळ प्रदेश हे निसर्गाचा समतोल राखण्यासाठी खूप महत्वाचे आहेत. अन्न साखळी मधील बरेचसे प्राणी, पक्षी हे या गवताळ प्रदेशांवर अवलंबून असतात. पावसाळ्याच्या आधी बऱ्याच निसर्ग प्रेमी संस्था, शाळा, कॉलेज व त्यांच्या हरित सेना, वनीकरण विभाग अशा रिकाम्या समजल्या जाणाऱ्या जमिनींवर वृक्षारोपण करतात. अशा प्रदेशांमध्ये वृक्षांची लागवड केल्याने तेथील मूळचा गवताळ अधिवास नष्ट होऊ लागतो आणि पर्यायाने गवतावर किंवा गवताळ भागावर अवलंबून असलेल्या सजीवांचे जीवन धोक्यात येते. गवताळ भागामध्ये केल्या गेलेल्या वृक्ष लागवडीचे घातक परिणाम भारत व इतर देशांमध्ये दिसून येत आहेत.

माळढोक हा पक्षी पूर्वी भारतामध्ये मोठ्या संख्येने दिसायचा. परंतु आता हा पक्षी नामशेष होण्याच्या मार्गावर आहे. हा पक्षी गवताळ भागामध्ये राहतो. प्रजननाच्या काळात या पक्ष्यांचा नर मादीला साद घालण्यासाठी एक विशिष्ट प्रकारचा आवाज करतो. आवाज करताना तो आपली मान खालून वर अशी उंच करतो. या पक्ष्याच्या अधिवासात वृक्षारोपण केल्याने त्याच्या आवाजाला अडथळा निर्माण होतो आणि साहजिकच या पक्षाची मादी नराला बघू शकत नाही आणि प्रजनन असफल होते. नालीया (गुजरात), नानज (महाराष्ट्र), राणीबेन्नूर (कर्नाटक) आणि रोल्लापाडू (आंध्रप्रदेश) येथे अशाच वनीकारणामुळे माळढोक पक्ष्यांची संख्या कमी झालेली दिसून येते.

धाविक हा असाच एक माळरानावर राहणारा पक्षी. याचे मुख्य अन्न गवतातील किडे हे आहे. या पक्ष्याची मादी शुष्क गवताळ भागांमध्ये अंडी देते. सांगली जिल्ह्यातील दंडोबा डोंगराच्या पायथ्याशी हा पक्षी मोठ्या संख्येने दिसायचा. परंतु आता तेथे केलेल्या वृक्षारोपणामुळे या पक्ष्याचे दर्शन दुर्मीळ झाले आहे.

दक्षिण आफ्रिकेमध्ये गवताळ प्रदेशांची संख्या खूप आहे. परंतु गेल्या काही वर्षात या गवताळ रानांवर वृक्षारोपण केले गेले आहे. संशोधकांच्या एका गटाने केलेल्या अभ्यासातून असे समोर आले आहे की या गवताळ भागांमधील वृक्ष लागवडीमुळे ब्लू क्रेन, ब्लू स्वालो आणि इतर पक्ष्यांची संख्या मोठ्या प्रमाणात कमी झाली आहे. अर्जेन्टिना मध्ये पक्षीसंशोधकांनी केलेल्या सर्वेक्षणामधून असे निष्कर्षास येते की तेथील गवताळ भागांमध्ये केलेल्या वृक्षारोपणामुळे सीड इटर्स, पिपीट, ब्लॅकबर्ड यांच्या संख्येवर घातक परिणाम होत आहे.

जंगलांचे जतन करणे जसे महत्त्वाचे आहे तसेच गवताळ प्रदेशांचे जतन करणे सुद्धा महत्त्वाचे आहे. हे गवताळ प्रदेश निसर्गाचा समतोल राखण्यामध्ये महत्त्वाची भूमिका पार पाडतात. वातावरणातील कार्बन डायऑक्साइडचे प्रमाण संतुलित राखण्यासाठी गवताळ प्रदेशांची मदत होते.

जनावरांचे मुख्य अन्न म्हणजे चारा. हा चारा गवताळ प्रदेशांमधून पुरवला जातो. आज सुद्धा भारतातील बहुतांशी भागांमध्ये जनावरे चरण अथवा माळरानावर अवलंबून आहेत. गवताळ भाग नष्ट झाले तर या गुरांना चारा कोठून मिळणार हा एक मोठा प्रश्न आहे. मुसळधार पाऊस आणि वारा यांमुळे जमिनीची धूप होते. परंतु गवताची मुळे मातीला घट्ट धरून ठेवतात आणि जमिनीची धूप होण्यापासून बचाव करतात. अशा जमिनींमध्ये पावसाचे पाणी मुरते आणि भूजलाची पातळी वाढते. गवताळ भागांमध्ये गवताव्यतिरिक्त बऱ्याच औषधी वनस्पती सुद्धा वाढतात. भारतातील काही आदिवासी जमाती या औषधी वनस्पतींवर आपले घर चालवतात.

निसर्गाचे संवर्धन करणे म्हणजे फक्त वृक्षारोपण करणे नाही. आपण वृक्षारोपण कोठे करतो आहोत याचा अभ्यास झाला पाहिजे. अन्यथा आपल्याकडे जे आहे तेच आपण गमावून बसू. झाडे लावायची असल्यास ती गवताळ प्रदेशांमध्ये न लावता वृक्षतोड झालेल्या जागी डोंगर टेकड्यांवर शहरातील रस्ते, शाळा, कॉलेज यांच्या आवारात लावावीत जेणेकरून नैसर्गिक अधिवासाला धोका पोहोचणार नाही. गवताळ भागांमध्ये वृक्षारोपण असेच चालू राहिले तर त्या भागातील प्राणी, पक्षी ती जागा सोडून जातील ती पुन्हा परत न येण्यासाठी.

– निनाद अमोल गोसावी
ninad.gosavi4@gmail.com

## टपाल तिकिटांच्या दुनियेत -

# संभाव्य संकटग्रस्त पक्षी (Vulnerable Birds)

भारतीय टपाल खात्यातर्फे १८ सप्टेंबर २०१७ रोजी संभाव्य संकटग्रस्त पक्ष्यांवर ५ रूपये किंमतीची तीन तिकीटे व मिनीयेचर शीट प्रकाशित केली आहेत.

निलगिरी जंगली कबूतर : ही प्रजाती पश्चिम घाटातील पर्वत श्रृंखलेतील स्थानिक प्रजाती म्हणून ओळखली जाते. उत्तर पश्चिम महाराष्ट्र, कर्नाटक, गोवा ते केरळ व पश्चिम तमिळनाडू या भागात दिसून येतो. निलगिरीतील जंगल हे त्यांचे माहेरघर आहे. म्हणून त्याला इंग्रजीत निलगिरी वूड पिजन हे नाव पडले. कपोत कुळातले हे मोठे कबूतर आहे. दिसायला खूप सुंदर असते. त्याचे डोके व खालचा भाग राखी असतो. त्याच्या पंखांचा रंग लालसर तपकिरी असतो. शेपूट रूंद व जाड तपकिरी असते. त्याच्या मानेवर काळ्या-पांढऱ्या ठिपक्यांचा चौकोन असतो. डोळे व चोच पिवळी असते. नाकाचा भाग व पायाचा रंग लाल असतो.




निलगिरी जंगली कबुतर हे एकटे किंवा ४-५ च्या थव्याने पानांच्या फांदीवर बसलेले असतात लवकर दिसत नाहीत व वानरासारखा हुपऽऽ हुपऽऽ आवाज करतात. दाट झाडीत फांद्या टाळून मोठ्या कौशल्याने उडतात. लहान गोगलगाई व खाली पडलेली फळे खातात.

रूंद शेपटीचा गवती वटवट्या : गवताळ प्रदेशाच्या सातत्याने कमी होणाऱ्या क्षेत्रफळामुळे या पक्ष्यांची संख्या खूपच कमी होत आहे. त्यामुळे संभाव्य संकटग्रस्त पक्ष्यांच्या सूचीमध्ये याची नोंद झाली आहे. भारताच्या पश्चिम घाटातील हा स्थानिक पक्षी आहे जो महाराष्ट्र, कर्नाटक, केरळ, आंध्र प्रदेश व तमिळनाडूमध्ये आढळून येतो.

या पक्ष्याच्या शरीराच्या खालील भाग पांढऱ्या रंगाचा असतो. प्रजनन काळात शरीराचा वरील भाग लालसर राखाडी रंगाचा असतो. तसेच शेपूट जाड व गोलाकार असते व त्यावर फिक्कट गर्द आडव्या व तिरप्या पट्ट्या असतात. फिक्कट पिवळ्या रंगाच्या भिवया डोळ्याच्या टोकापर्यंत पसरलेल्या असतात.

निलगिरी पिपीट : ही प्रजाती असुरक्षित म्हणून गणली गेली आहे, त्याचे कारण म्हणजे या पक्ष्याचा प्राकृतिक अधिवास व क्षेत्रफळ व गुणवत्ता कमी होत गेल्यामुळे कमी संख्येने असणाऱ्या या पक्ष्याच्या संख्येत अजूनही घट होण्याची शंका व्यक्त केली जात आहे. पश्चिम घाटातील केरळ, कर्नाटक व तमिळनाडूमधील ही स्थानिक प्रजाती आहे. आपल्या सीमित क्षेत्रामध्ये, विशेषतः २००० मी. उंचीवर आढळून येते. बऱ्याच वेळा १००० मी. उंचीवर सुद्धा दिसून येतो. घाटामध्ये आढळणाऱ्या वेलीवर आपले अन्न ग्रहण करते. परंतु घरटी बांधण्यासाठी पाण्याच्या प्रवाहाजवळील गवताळ प्रदेश व उंच गवत असलेल्या भागाची निवड करतात.

- रवींद्र वामनाचार्य


*मोबाईल : ९८९०३९०५२७,*

*इ-मेल : r_wamanacharya@yahoo.co.in*


# स्वागत नव्या सभासदांचे

| क्र. | नाव | जिल्हा | फोन नं. | e-mail |
|---|---|---|---|---|
| १०२१ | श्री. संतोष गुळवणी | मुंबई | ९८२१९६४३९३ | santoshgulavani@hotmail.com |
| १०२२ | प्रतीक्षा आनंद नाईक | मुंबई | ७२०८१३८१९७ | pratiksha.naik31@gmail.com |
| १०२३ | श्री. रवींद्र शंकरराव शिंदे | सातारा | ९४२२४०४७९९ | ravishinde12026@gmail.com |
| १०२४ | स्वाती अविनाश कदम | ठाणे | ९८२०२७०१६६ | saakadam@rediffmail.com |
| १०२५ | डॉ. दीपा राठी | ठाणे | ९८६९०१९०४१ | dr.deepa.rathi@gmail.com |
| १०२६ | श्री. मुकुंद मधुकर अभ्यंकर | मुंबई | ९८६९३६२३०९ | abhyankar.mumbai@gmail.com |
| १०२७ | श्री. विलास विनायक सावंत | डोंबिवली | ९८२०२५६९८८ | shreevvairam@gmail.com / vvsawant64@gmail.com |
| १०२८ | डॉ. पुरुषोत्तम गोपालकृष्ण काळे | डोंबिवली | ९३२२५०७६८५ | pgkale@gmail.com |
| १०२९ | श्री. शरद गायधने | ठाणे | ९८६७३१०५६९ | sharad.gaidhane@gmail.com |
| १०३० | डॉ. अनिता जयपाल आवटी | रत्नागिरी | ९९६००३३५६७ | anitaawati@yahoo.in |

संस्था परिचय -

# चातक नेचर कॉन्झर्वेशन सोसायटी, वरणगाव

निसर्गप्रेमी व पर्यावरण क्षेत्रात कार्य करणाऱ्या व्यक्तींनी एकत्र येऊन निसर्गसंवर्धनाच्या कामांना अधिक गती अणि गांभीर्य यावे या हेतूने चातक निसर्ग संवर्धन संस्था २२ एप्रिल २०११ मध्ये स्थापन झाली व २०१२ मध्ये पंजीकृत झाली. निसर्ग संवर्धन, संरक्षण, पक्षीनिरीक्षण, पर्यावरण जनजागृती तसेच निसर्गातील विविध घटकांचा शास्त्रीय आणि प्रत्यक्ष अनुभवावर आधारित अभ्यास व्हावा यासाठी संस्था कार्य करीत आहे

**संस्थेचे कार्य :**

✻ दरवर्षी संस्था वृक्षबीजांचे वाटप, वृक्षारोपण अणि वृक्षसंवर्धनाचे कार्य करीत असते.

✻ विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणीय जागृती निर्माण व्हावी म्हणून संस्था छायाचित्र प्रदर्शन, स्लाईड शो, व्याख्याने, अरण्यवाचन, पक्षीनिरीक्षण. चित्रकला स्पर्धा, निबंधस्पर्धा यासारखे कार्यक्रम आयोजित करते.

✻ संस्था जखमी अवस्थेतील प्राणी-पक्ष्यांवर उपचार व त्यांची देखभाल करते.

✻ दरवर्षी कृत्रिम घरटी आणि जलपात्रांचे वितरण करून पक्ष्यांसाठी अन्न, पाणी अणि अधिवासाची सोय व्हावी यासाठी लोकांना उद्युक्त करते.

✻ प्राणी-पक्ष्यांची होणारी शिकार, अवैध तस्करी तसेच वृक्षतोड व लाकडांची चोरटी वाहतूक थांबवण्यासाठी वनविभागाच्या मदतीने प्रयत्नरत असते.

✻ गणेशोत्सवात पीओपीच्या मूर्तींना फाटा देऊन मातीच्या गणेश मूर्ती ना नफा तत्वावर उपलबध करून देते तसेच विसर्जनावेळी निर्माल्य संकलन करून नदीप्रदूषण रोखण्यासाठी प्रयत्न करत असते.

✻ हतनूर धरणावरील पक्ष्यांची मोठी संख्या पाहता त्यांच्या अधिवासाचे सरंक्षण व्हावे या हेतूने प्रयत्न करत असते. संस्थेने वेळोवेळी केलेला पत्राचार तसेच अहवालांचे गांभीर्य ओळखून BNHS ने हतनूर जलाशय परिसर महत्वपूर्ण पक्षी अधिवास क्षेत्र (IBA) म्हणून घोषीत केले आहे.

✻ संस्था दरवर्षी विविध ठिकाणी होणाऱ्या पशु-पक्षी गणनेत सहभागी होत असते.

✻ संस्थेतर्फे नियमित त्रैमासिक, विशेषांक, पर्यावरणावरील शास्त्रीय अभ्यासपूर्ण लेख, पक्षीसूची, डॉक्युमेंटरी फिल्म्स प्रकाशित होत असतात.

✻ संस्था पर्यावरणाशी संबंधित असलेले दिवस, सप्ताह तसेच अभियान साजरे करीत असते.

संस्थेला वसुंधरा चित्रपट महोत्सवात 'पर्यावरण मित्र' पुरस्कार मिळाला आहे.

✻ पर्यावरण संवर्धनासाठी उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींचा संस्थेतर्फे दरवर्षी 'सृष्टिमित्र' पुरस्कार देऊन गौरव केला जातो.

''सृष्टी रक्षति रक्षितः'' हे ब्रीद घेऊनच संस्था सदैव कार्यरत असते.

संस्थेचे पदाधिकारी असे : अध्यक्ष श्री. अनिल महाजन,
उपाध्यक्ष श्री. शिवाजी जावरे व चिटणीस श्री. उदय चौधरी.

इ-मेल : cnc.varangaon@gmail.com

# तुमची दिवाळी - आमची होळी

अंधश्रद्धा आणि परंपरा यांचा इतका दाट पगडा आहे की समाजातले काही घटक त्यासाठी कोणताही विधीनिषेध न बाळगता क्रूरपणे वागतात. हे लोक एकीकडे घुबडाला लक्ष्मीदेवीचे वाहन म्हणून पूज्य मानतील पण तीच लक्ष्मी आपल्याला वश करून घेण्यासाठी घुबडाला दिवाळीच्या लक्ष्मीपूजनाला अमानुषपणे संपवतील. तांत्रिक लोक धनप्राप्तीसाठी घुबडाच्या शरीराच्या विविध भागांचा उपयोग सांगतात. त्यातही आकाराने मोठ्या चणीची व खास करून ज्याची पिसे डोक्यावर उभी राहिल्यासारखी असतील त्यांना बळी देण्यास तयार असतात.



अशी घुबडे मिळविण्यासाठी चोरट्या विक्रीचा आधार घेतला जातो. भारतात नोंदल्या गेलेल्या ३० जातींच्या घुबडांपैकी १५ जातींची चोरटी विक्री होते.

खरे म्हणजे घुबड पक्षी उंदीर, उपद्रवी कीटकांचा नाश करून शेतकऱ्यांना मदत करीत असतो. पण 'मला त्याचे काय?' म्हणत धनलोभी त्यांच्या जीवावर उठतात. घुबडांचा चोरटा व्यवहार रोखण्यासाठी वन कर्मचाऱ्यांबरोबरच रेल्वे, कस्टम, पोलीस खात्यानेही खबरदारी घेतली पाहिजे. पक्षीप्रेमीही महत्त्वाची कामगिरी करू शकतात.

# अर्थ ओव्हर शूट डे

दरवर्षी आपण अनेक दिवस साजरे करत असतो. पर्यावरणदिन, वनदिन, पाणथळ दिन असे अनेक. हे दिवस ठराविक तारखेला पाळले जातात. पण अर्थ ओव्हर शूटची तारीख निश्चित नाही. कशी असणार? कारण नैसर्गिक साधनसंपत्ती आपण संपवत असतो, जी पृथ्वीच्या साधनसंपत्तीपेक्षा जास्त असते. म्हणजेच आपण निर्मितीहून अधिक संपवत असतो. म्हणजे आपण ऋण करीत असतो. त्यामुळे हा दिवस अलीकडे येत राहतो. यंदाच्या वर्षी हा २ ऑगस्टला पाळला गेला. तो पुढे ढकलायचा असेल तर नैसर्गिक साधनसंपत्तीचा ऱ्हास कमी करून तो निर्मितीपेक्षा कमी केला पाहिजे. म्हणजे वृक्षसंपदा वाढवली पाहिजे आणि कोळसा, डिझेल, पेट्रोल कमी जाळले पाहिजे. करता येईल ना हे?

## वादळातून सुटका

समुद्रावरून घोंगावत येणारी वादळं सापडेल त्याला भिरकावून देत असतात. त्यात एखाद्या पक्ष्याचा काय पाड लागणार? पण नाही. झालं असं की हार्वे हरिकेन अमेरिकेच्या टेक्सास किनाऱ्यावर आदळण्यापूर्वी विल्यम ब्रुसो हा टॅक्सी ड्रायव्हर खरेदी करून परत आला तेव्हा कूपर हॉक हा ससाणा त्याच्या टॅक्सीत मागच्या सीटवर बसलेला होता. ब्रूसोने त्याला हुसकावण्याचा प्रयत्न केला पण तो जाम हलायला तयार नव्हता. तेव्हा ब्रूसो त्याला घरी घेऊन आला. स्वयंपाकघरातल्या मांडणीवर तो विसावला. त्याला कोंबडीचे तुकडे खायला मिळाले. वाटीतले पाणी तो प्यायला.

ब्रूसोने प्राणीनिवारा संघटनेशी संपर्क साधला. त्या संस्थेच्या स्वयंसेवकांनी त्याच्यावर उपचार केले. तो बरा झाल्यावर प्लानोच्या निसर्गवनात त्याला सोडण्यात आले.

## पक्षीमित्रांना आवाहन

आपली पक्षीनिरीक्षणे, पक्षीअभ्यास प्रकल्प, पक्ष्यांचे प्रथम दर्शन, शास्त्रीय पेपर इत्यादी पाठवावे. पक्षीमित्रमध्ये प्रसिद्ध केले जाईल. लिखाण हाती लिहून, टाईप करून ई-मेलने pakshimitra@gmail.com वर अथवा पोस्टाने महाराष्ट्र पक्षीमित्र, ११, युनायटेड पार्क, मार्कंडी, चिपळूण या किंवा संपादकांच्या पत्त्यावर पाठवावे.

महाराष्ट्र पक्षीमित्रचे आजच

## सभासद व्हा !

एकदाच ₹ ५००/- भरा व आजीवन सभासदत्व मिळवा. आपण सभासद असाल तर अजून एक तरी सभासद नोंदवा.

### सभासद कसे व्हाल ?

१) डी.डी. / मनीऑर्डर, "महाराष्ट्र पक्षीमित्र" या नावे चिपळूण येथे देय असलेला असावा.

२) Core Bank System नेही पैसे पाठवू शकता.
बँकेचे नाव : बँक ऑफ महाराष्ट्र, चिपळूण शाखा.
खात्याचे नाव : महाराष्ट्र पक्षीमित्र. बँक खाते नं.: ६००३६८१२०१७

खात्यात पैसे भरून त्वरित मेलने कळवणे, तसेच सभासदत्व अर्ज भरून पोस्टाने पाठवणे अत्यावश्यक आहे. सोबत पे-इन-स्लीपची झेरॉक्स जोडावी.

Registered with the Registrar of Newspaper in India under serial No. MAHMAR/2012/51349

Book Packet containing periodicals

प्रती,

प्रेषक :
महाराष्ट्र पक्षीमित्र
११, युनायटेड पार्क, मार्कंडी,
चिपळूण, जि.रत्नागिरी - ४१५ ६०५
फोन : (०२३५५) २५३०३०
E-mail : pakshimitra@gmail.com
website : www.pakshimitra.org

पक्षीमित्र
संपादक : दिगंबर गाडगीळ
मूल्य ₹ ५/-
मासिकात व्यक्त केलेल्या विचारांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
अक्षरजुळणी : प्रिंटवेब, नाशिक
मुद्रक : एस. व्ही. प्रेस - चिपळूण फोन : (०२३५५) २५२३३०